www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार मराठी




मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : १७५ वा मंगळवार दि. ११ मार्च २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

## शिवशाही सेनाच्या वतीने महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा







**दैनिक युवक आधार**

**सुरेश भोईर । कार्यकारी संपादक** : जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून शिवशाही सेना आणि पश्चिम महाराष्ट्र सेवा संघाचे संस्थापक आयोजक राजकुमार पाटील यांच्या वतीने कामोठे येथे रविवार दिनांक ९ मार्च२०२५ रोजी महिलांसाठी शरीर सौष्ठव स्पर्धा व गुणवंत महिलांचा सन्मान सोहळा तसेच महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. शिवलीला ताई पाटील त्यांच्या सुश्राव्य कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश महिलांच्या सक्षमीकरणाला प्रोत्साहन देणे त्यांचे योगदान व कार्य यांची प्रशंसा करणे तसेच समाजातील विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा कार्य समाजापुढे आणणे हा आहे ह.भ.प.शिवलीला ताई पाटील यांच्या सुश्राव्य कीर्तन ऐकण्यासाठी कामोठे वसातील नागरिकांनी एकच गर्दी केली होती.. विठुरायाच्या नामस्मरणाने उपस्थितांना आत्मशांती व प्रेरणा मिळाली या कार्यक्रमासाठी विधान परिषदेचे आमदार विक्रांत पाटील म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील समाजसेविका मोहिनी ताई पाटील माजी आमदार बाळाराम पाटील नगरसेवक शंकर म्हात्रे. प्रमोद भगत.सखाराम पाटील.आदी मान्यवर व कामोठे वसाहतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



( छाया मुकुंद कांबळे )

**दैनिक युवक आधार**

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती यांची भेट जोगेंद्र समोसे दैनिक योग आधार उदगीर माननीय श्री प्रसन्न भालचंद्र वराळे भारत सरकारच्या सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती यांच्याशी आज संवाद साधण्याचा योग आला याप्रसंगी सर्वोत्तम भूमिपुत्र गौतम बुद्ध व पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले याप्रसंगी लातूरचे लोकप्रिय विधीज्ञ माझे गुरु श्री कालिदासरावजी देशपांडे व चिरंजीव सुयश बिरादार

### महसूल वाढीसाठी उपाययोजना

- थकबाकीबाबत तडजोड करण्यासाठी 'अभय योजना'.
- मुद्रांक शुल्कात सध्या १०० रुपये आकारले जातात, मात्र आता एकाच व्यवहाराच्या पूर्ततेसाठी एकापेक्षा अधिक दस्तावेज असल्यास १ हजार रुपये शुल्क आकारले जाणार.
- राज्यात ७,५०० किलो वजनाची वाहतूक करणाऱ्या हलक्या वाहनांवर एकरकमी वाहनांच्या किमतीच्या ७ टक्के दराने कर आकारणी करण्यात येणार असून त्यामुळे राज्याच्या तिजोरीत ६२५ कोटींचा महसूल जमा होणार.
- बांधकामासाठी कॉम्प्रेसर, प्रोजेक्टर्स आणि एस्कॅव्हेटर्स या प्रकारातील वाहनांना एकरकमी वाहनांच्या किमतीच्या ७ टक्के कर आकारणी करण्यात येणार असून राज्याच्या तिजोरीत यामुळे १८० कोटींचा महसूल जमा होईल.
- ३० लाखांवरील इलेक्ट्रिक वाहनांवर ६ टक्के दराने कर आकारणी.

# कर्जभाराने आश्वासनांचे रंग फिके

शेतकरी, लाडक्या बहिणींना ठेंगा | ३० लाखांवरील वाहनांवर कर आकारणी | पायाभूत सुविधांवर भर | संगमेश्वर येथे संभाजी महाराजांचे भव्य स्मारक उभारणार | ४५ हजार ८९१ कोटींचा तुटीचा अर्थसंकल्प

**मुंबई : विधानसभा निवडणूक जिंकण्यासाठी 'होऊ द्या खर्च' म्हणत लोकानुयायी योजनांची उधळण केलेल्या महायुतीला आता सत्तेवर पुन्हा येताच उत्पन्न व खर्चाची तोंडमिळवणी करताना तारेवरची कसरत करावी लागत असल्याचे राज्याच्या २०२५-२६ च्या अर्थसंकल्पातून स्पष्ट झाले आहे. अर्थमंत्री अजित पवार यांनी राज्याचा ७ लाख कोटीं रुपयांचा व ४५ हजार ८९१ कोटींच्या तुटीचा अर्थसंकल्प सोमवारी विधानसभेत सादर केला. मात्र, या बजेटमध्ये शेतकरी व लाडक्या बहिणींच्या पदरी निराशाच आली आहे.**



### लाडक्या बहिणींसाठी ३६ हजार कोटी

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी सन २०२४ - २५ च्या अर्थसंकल्पात ४६ हजार कोटींची तरतूद करण्यात आली होती. या योजनेंतर्गत जुलै २०२४ ते मार्च २०२५ पर्यंत सुमारे २ कोटी ५३ लाख महिलांना आर्थिक लाभ मिळाला. त्यासाठी ३३ हजार दोन कोटी रुपये खर्च झाला आहे. सन २०२५-२६ मध्ये या योजनेसाठी एकूण ३६ हजार कोटी रुपये प्रस्तावित आहेत.

### राज्याचा अर्थसंकल्प असा

**महसुली तूट**
- ४५ हजार ८९१ कोटी रुपये

**महसूल उत्पन्न**
- ५ लाख ६० हजार ९६४ कोटी

**महसुली खर्च**
- ६ लाख ६ हजार ८५५ कोटी

**वित्तीय तूट**
- १,३६,२३४ कोटी

**एकूण बजेटचा आकार**
- ७ लाख २० हजार

### ५० लाख रोजगार निर्माण करणार

महाराष्ट्राचे नवीन औद्योगिक धोरण आखण्यात येणार आहे. पाच वर्षाच्या कालावधीत ४० लाख कोटी रुपयांची गुंतवणूक व ५० लाख रोजगार निर्मिती अपेक्षित आहे, असे अजित पवार यांनी अर्थसंकल्पीय भाषणात म्हणाले.



### मुंबईतील पायाभूत सुविधांसाठी ६४ हजार कोटींचा खर्च

मुंबई उपनगरातील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी वर्सोवा ते मढ, वर्सोवा ते भाईंदर कोस्टल रोड, मुलुंड - गोरेगाव, ठाणे ते बोरिवली आणि ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह भुयारी मार्ग यासाठी ६४ हजार ७८३ कोटींचा खर्च. छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळदरम्यान मेट्रोचे काम हाती घेण्यात येणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्याचा संकल्प केला आहे. त्याच्याशी सुसंगत असे राज्याचे बजेट असल्याचे अर्थमंत्री अजित पवार यांनी सांगितले.

### गड, किल्ल्यांकडे दुर्लक्ष; स्मारकांवर भर

राज्यातील गड व किल्ल्यांची दुरवस्था झाली असून त्यांची डागडुजी, देखभाल करणे महत्त्वाचे आहे. मात्र, राज्य सरकारने महाराजांच्या गड, किल्ल्यांकडे दुर्लक्ष करत भव्य स्मारक उभारण्यावर अर्थसंकल्पात जोर दिला आहे.

- तळेगाव - चाकण - शिक्रापूर या रस्त्याच्या तळेगाव ते चाकण या २५ किमी लांबीचा चारपदरी उन्नत मार्ग बांधण्यात येणार असून यासाठी ६ हजार ४९९ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.
- केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत ३ ऑक्टोबर रोजी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला. त्यामुळे महाराष्ट्रात यापुढे ३ ऑक्टोबर हा 'अभिजात मराठी भाषा दिन' म्हणून साजरा करण्यात येणार आहे.
- बजेटमध्ये ऊर्जा विभागासाठी २१ हजार ५३४ कोटी रुपये प्रस्तावित आहेत. तर पर्यावरण व वातावरणीय बदल विभागासाठी २४५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

### महाराष्ट्र केलाय कर्जबाजारी - उद्धव ठाकरे

महायुती सरकारने सादर केलेला आजचा अर्थसंकल्प हा गेल्या १० हजार वर्षांतील सर्वात बोगस अर्थसंकल्प आहे. हा अर्थसंकल्प पाहून मला आचार्य अत्रे यांची आठवण झाली. आज ते असते तर असा बोगस अर्थसंकल्प मी मागच्या १० हजार वर्षांत पाहिला नाही, असे ते म्हणाले असते. उद्याचा सूर्य उगवेल, सर्वांना प्रकाश मिळेल व त्यातून व्हिटामिन बीसुद्धा मिळेल, अशा आशयाचे हे बजेट आहे. 'मारल्या होत्या थापा भारी आणि महाराष्ट्र केलाय कर्जबाजारी,' अशी घणाघाती टीका शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केली.

### अर्थसंकल्प संतुलित आणि लोकाभिमुख - फडणवीस

राज्याचा नवा अर्थसंकल्प हा "संतुलित आणि लोकाभिमुख" असून तो विकसित भारतातील विकसित महाराष्ट्राच्या दृष्टीकोनाशी सुसंगत आहे. हा अर्थसंकल्प कृषी, उद्योग, पायाभूत सुविधा, रोजगार आणि सामाजिक विकास या पाच सूत्रांवर आधारित आहे. राज्याला प्रभावी महसूल संकलन आणि खर्चामुळे वित्तीय तूट २.९% वरून २.७% पर्यंत कमी करण्यात यश आले आहे. महाराष्ट्राचा अर्थसंकल्प आता ७ लाख कोटींच्या टप्प्यावर पोहोचला आहे. यामुळे तो भारतातील सर्वात मोठ्या राज्य अर्थव्यवस्थांपैकी एक ठरला आहे, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महायुतीच्या अर्थसंकल्पाची प्रशंसा केली.

## रायगड जिल्हा परिषद शिक्षण विभागात प्राथमिक शिक्षक समितीची विविध प्रश्नांच्या संदर्भात भेट

**दैनिक युवक आधार**

**अलिबाग /रायगड** : बुधवार, दि. ५मार्च २०२५ रोजी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती रायगड यांनी डॉ.भरत बास्टेवाड ( भा.प्र.से) मुख्य कार्यकारी अधिकारी राजिप अलिबाग,पुनिता गुरव शिक्षणाधिकारी (प्राथ) राजिप अलिबाग,तसेच मा.जिल्हाधिकारी कार्यालय अलिबाग, मा.जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालय अलिबाग यांची भेट घेण्यात आली.



**भेटी दरम्यान खालील विषयावर चर्चा करण्यात आली.**

१) शासन निर्णय दि .१५ मार्च २०२४ संचमान्यता जीआर मुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान व अतिरिक्त होणारे शिक्षक यासंदर्भातील अन्यायकारक जी आर रद्द करणेसंदर्भात दि. १७ मार्च २०२५ रोजी होणाऱ्या १ दिवसीय धरणे आंदोलनासंदर्भात निवेदन देऊन चर्चा करण्यात आली.

२) दि. १ नोव्हेंबर पूर्वीची जाहिरात असलेल्या शिक्षकांना जुनी पेन्शन लागू करण्या संदर्भातील ८८ प्रस्तावापैकी प्रलंबित ठेवलेले 24 प्रस्ताव तात्काळ मंजूर करून राहिलेल्या शिक्षकांचे जीपीएफ(GPF) अकाउंट उघडणेबाबत वित्त विभाग व सामान्य प्रशासन विभाग येथे प्रत्यक्ष जाऊन आढावा घेण्यात आला

३) मार्च 2024 मध्ये राहिलेले शिक्षण सेवकांचे मानधन अदा करणेबाबत प्रत्येक तालुक्याने स्वतंत्र पुरवणी बील सादर करावे याबाबत चर्चा करण्यात आली.

४) शिक्षकांचे विविध प्रलंबित प्रश्ना संदर्भात चर्चा करण्यात आली.यावेळी शासन मान्यताप्राप्त महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती रायगडचे जिल्हाध्यक्ष, विजयजी येलवे, ब्रिजेश भादेकर , संजय बागडे, शिक्षक , मान्यवर,उपस्थित होते.

## कोकण समुद्रमार्गे अति जलद प्रवास

### मुंबई ते गोवा प्रवास 6 तासांत होणार

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे रेवदंडा** : रस्ते किंवा रेल्वेमार्गे नव्हे तर कोकण समुद्र मार्गे जलवाहतुक सेवा.मुंबई गोवा महामार्ग.... महाराष्ट्रातील नेहमी चर्चेत असणारा मार्ग मागील 14 वर्षांपासून मुंबई गोवा महामार्गाचे काम रखडले आहे. त्यातच मुंबई महामार्गाला पर्याय म्हणून नविन कोकण एक्सप्रेस वे बांधला जात आहे. तर, कोकण रेल्वे मार्गावर अनेक सुपरफास्ट ट्रेन देखील सुरु करण्यात आल्या आहेत. मात्र,आता खरचं मुंबई गोवा प्रवास 6 तासांत होणार आहे. रस्ते किंवा रेल्वेमार्गे नव्हे थेट समुद्रमार्गे अति जलद प्रवास करता येणार आहे. मुंबई ते गोवा हे अंतर 589 किमी इतके आहे. मुंबई ते गोवा या प्रवासाठी सध्या वाहतुकीचे दोन पर्याय आहेत. एक म्हणजे कोकण रेल्वे आणि दुसरा म्हणजे मुंबई गोवा महामार्ग. मुंबई गोवा महामार्गे प्रवासासाठी 10 ते 12 तास लागतात. तर, रेल्वेने गेल्यास प्रवासासाठी 8 ते 9 तासांचा वेळ लागतो. मात्र, आता समुद्र मार्गे हाच मुंबई गोवा प्रवास फक्त 6 तासात शक्य होणार आहे.जल वाहतूक सेवा देणाऱ्या एका खाजगी कंपनीच्या माध्यमातून मुंबई ते गोवा अशी रो रो बोट सेवा सुरु केली जाणार आहे. प्रवासी जहाजाच्या माध्यमातून प्रवाशांन मुंबई गोवा प्रवास करता येणार आहे. गोव्याला जाणारे हे खाजगी जहाज मुंबईतून निघेल. मुंबईतील माझगाव ते गोव्यातील मुरगाव दरम्यान अशी ही रो रो फेरी असेल. सुरुवातील प्रायोगीक तत्वातावर 60 प्रवाशांची क्षमता असलेल्या जहाजाच्या माध्यमातून ही रो रो सेवा उपलब्ध करुन दिली जाणार आहे. या रो रो सेवेमुळे महाराष्ट्र आणि गोवा दोन्ही राज्यांच्या पर्यटनासाठी फायदा होणार आहे. मात्र, मुंबई गोवा जलवाहतूक कधी पर्यंत सुरु होईल याबाबत कोणतीही माहिती समोर आलेली नाही



## जागतिक महिला दिनानिमित्त रायगड प्रेस क्लब संलग्न

### पनवेल तालुका प्रेस क्लब तर्फे कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

## महिला सुरक्षा ही आमची प्राथमिकता : आयुक्त मंगेश चितळे




**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** : जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून रायगड प्रेस क्लब संलग्न पनवेल तालुका प्रेस क्लब तर्फे विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांचा सन्मान वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात करण्यात आला. यावेळी पनवेलचे महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे, तहसीलदार विजय पाटील, अतिरिक्त आयुक्त कैलास गावडे, पिल्लई कॉलेजच्या निवेदिता श्रेयन्स आणि पनवेल प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत शेडगे यावेळी उपस्थित होते. यावेळी बोलताना आयुक्त मंगेश चितळे यांनी सांगितले की, देशाचे पंतप्रधान यांनी सांगितले की, महिला सुरक्षा ही प्राथमिकता असून पनवेल महानगरपालिका देखील त्या अनुषंगाने महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने महानगरपालिकेमार्फत बनविण्यात येणाऱ्या ॲपमध्ये महिलांसाठी निर्भया हेल्पलाईनचा समावेश करण्यात आला असल्याची माहिती दिली.यावेळी विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यामध्ये निवेदिता श्रेयन्स (पिल्लई कॉलेज), गीतांजली पाटील (अग्नीशमन दल, पनवेल), स्मिता जोशी (उद्योजिका, वीणा वर्ल्ड), स्वप्नाली चौधरी (पनवेल महानगरपालिका), आरती रेवसकर (मंडळ अधिकारी, कळंबोली), ॲड.सुचिता पाटील (वकील, पनवेल), वर्षा कुलकर्णी (जनसंपर्क अधिकारी, पनवेल महानगरपालिका), साधना पवार (पनवेल शहर पोलीस स्टेशन), शिला सांगळे (सायबर पोलीस स्टेशन, नवी मुंबई), तृप्ती पालकर (पत्रकार), रोहिणी कुरंदेकर (उद्योजिका, रोहिणी कॅटरर्स), चित्रलेखा जाधव (शिक्षिका, उसर्ली, पनवेल), रुपाली हिर्लेकर (निवेदिका), श्वेता कुमार (मिडीया सेल) यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी पनवेल तालुका प्रेस क्लबचे सचिव दत्तात्रय कुलकर्णी, उपाध्यक्षा तृप्ती पालकर, खजिनदार राकेश पितळे, सहसचिव स्वप्नील दुधारे, सल्लागार सुमंत नलावडे, अनिल भोळे, रायगड प्रेस क्लब जिल्हा सल्लागार, संजय कदम, सदस्य गणेश कोळी, सचिन भोळे, सन्नी पांडे, प्रतिक वेदपाठक आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रंगभूमीकार आणि ज्येष्ठ पत्रकार विजय पवार यांनी केले तर आभार प्रदर्शन अध्यक्ष प्रशांत शेडगे यांनी मानले.

**महिलांसाठी येणाऱ्या काळात पनवेल महानगरपालिकेतर्फे सुरक्षा आणि रोजगार या संदर्भात विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. यामध्ये पर्यावरणपुरक पिंक रिक्षा हा पनवेल महानगरपालिकेचा उपक्रम शासनाकडे मंजूरी पाठविण्यात आला असून लवकरच त्याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.**

**मंगेश चितळे, आयुक्त, पनवेल महानगरपालिका**

**आजमितीला महिला सर्वच क्षेत्रात योगदान हे पुरुषांच्या बरोबरीचे किंवा काही क्षेत्रात काकणभर अधिकच आहे. सरकार महिलांसाठी विविध योजना राबवित असून त्यांचा अधिकाधिक फायदा महिलांनी घेण्यासाठी महसूल प्रशासनातर्फे सर्वतोपरी सहकार्य केले जाते**

**विजय पाटील, तहसीलदार, पनवेल**



## संपादकीय

## ११ मार्च छत्रपती संभाजी महाराज पुण्यतिथी

### जगाला स्वाभिमानाची प्रेरणा देणारे महाप्रतापीधर्मवीर संभाजी महाराज

छत्रपती संभाजी महाराजांचा जन्म १४ मे इ.स.१६५७ रोजी पुरंदर येथे झाला आणि हिंदवी स्वराज्यात तेजस्वी तारा प्रगट झाला.राजपुत्र असल्यामुळे रणांगणातील मोहीम व राजकारणातील डावपेच यांचा संपूर्ण अभ्यास अवगत होता. त्याचप्रमाणे लहानपणापासूनच ते अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचे मोठे धनी होते. संभाजींना लहानपणापासूनच अनेक कठीणायीचा सामना करावा लागला. संभाजी महाराज लहान असतांनाच त्यांच्या आई महाराणी सईबाई यांचे निधन झाले आणि त्यांच्या काळजावर मोठा आघात झाला.या आघातापासुन सावरण्यास राजमाता जिजाबाई यांनी आपले सर्वस्व पणाला लावले आणि हिंदवी स्वराज्याच्या निर्मितीसाठी व रक्षणासाठी शूरवीर संभाजी नावाचा महामेरू उभा केला. संभाजींची सावत्र आई पुतळाबाई यांनी आपल्या मुलासारखी वागणुक देवुन वटवृक्षाचे काम केले.परंतु त्यांची दुसरी सावत्र आई सोयराबाई यांनी संभाजीराजांच्या रस्त्यात बाभळीचे काटे रोवुन पोरकेपणाची वागणुक दिली व महाराजांच्या राजकीय कारकीर्दीत ढवळाढवळ करण्याचा प्रयत्न केला. संभाजीच्या मनात लहानपणापासूनच आपण स्वराज्यासाठी काहीतरी केले पाहिजे.या उद्देशाने त्यांनी राजकारणातील संपूर्ण बारकावे आत्मसात केले. मुगलांच्या घडामोडी आणि राजकारण त्यांना लहान वयातच कळले.त्याचप्रमाणे संस्कृतसह इतर आठ भाषांचे ज्ञान त्यांना अवगत होते. याचा फायदा भविष्यात व्हावा या विचाराने शिवाजी महाराजांनी त्यांना आग्रा भेटीच्या वेळी बरोबर नेले.त्यावेळी संभाजीराजे फक्त ९ वर्षाचे होते.शिवाजी महाराज औरंगजेबाच्या नजरकैदेतुन निसटल्यानंतर त्यांना संभाजींची चिंता वाटू लागली.औरंगजेब आगबबुला झाला अशा वेळी संभाजीराजे स्वराज्यात सुखरूप पोहचावे या उद्देशाने शिवाजी महाराजांनी संभाजीराजांचे निधन झाल्याची अफवा सर्वत्र पसरवून मोगलांच्या डोळ्यात धुळ झोकून संभाजींना महाराष्ट्रात सुखरूप पोहचण्याचा मार्ग मोकळा केला.इ.स.१६७४ मध्ये शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला.शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाल्यानंतर अवघ्या १२ दिवसातच राजमाता जिजाऊंचे निधन झाले आणि पुन्हा संभाजींना मोठा जब्बर धक्का बसला.त्यानंतर त्यांच्याकडे मायेने लक्ष देणारे कोणी राहिले नाही.कारण शिवाजी महाराज स्वराज्याच्या राजकारणात आणि रणांगणावर गुंतले होते.छत्रपती संभाजीं महाराजांनी आपल्या वडिलांप्रमाणेच सक्तीने धर्मांतरन करणाऱ्या इंग्रज, पोर्तुगीज व मोगल सत्ताधाऱ्यांचा कडाडून विरोध केला.औरंगजेबाने इ.स.१६८२ साली मराठ्यांवर हल्ला केला.औरंगजेब सैन्य, दारूगोळा, हत्ती-घोडे याबाबतीत बलशाली होता.कारण औरंगजेबाचे सैन्य संभाजीं महाराजांच्या तुलनेत ५ पटीने अधिक होते.त्याकाळी जगातील सर्वात शक्तिशाली सैन्यामध्ये औरंगजेबाचा समावेश होता. तरीही संभाजीं महाराजांच्या नेतृत्वाखाली मराठयांनी हिमतीने लढा दिला.त्याचप्रमाणे संभाजीं महाराजांनी गोव्याचे पोर्तुगीज, जंजिऱ्याच्या सिद्धी आणि म्हैसूरचा चिक्कदेवराय या शत्रूंना जोरदार धडा शिकवला.त्यामुळे संभाजीं महाराजांच्या विरूद्ध औरंगजेबाला मदत करायची हिंमत कोणाचीही झाली नाही. कारण त्याकाळी संभाजीं म्हणजे एक वादळी तुफान होते. त्यामुळेच संभाजीं महाराजांच्या नेतृत्वाखालील मराठ्यांनी मोठ्या शिताफीने झुंज दिली.इ.स.१६८९ च्या सुरूवातीला संभाजीं महाराजांनी त्यांच्या महत्वाच्या सरदारांना बैठकीसाठी कोकणातील संगमेश्वर येथे बोलावले.१ फेब्रुवारी इ.स.१६८९ रोजी संभाजीं महाराज रायगडाकडे रवाना होत असतानाच औरंगजेबाचा सरदार मुकर्रबखान याने नागोजी माने यांच्या साथीने संगमेश्वरावर हल्ला केला.मराठ्यात आणि शत्रूच्या सैन्यात मोठी चकमक झाली.मराठ्यांचे संख्याबळ कमी असल्याने शत्रूचा हल्ला परतवून लावू शकले नाही.त्यामुळे शत्रूने संभाजीं महाराजांना व त्यांच्या सोबत असलेल्या कवि कलश यांना जिवंत पकडले.अशाही परीस्थितीत महाराजांना वाचविण्याचा प्रयत्न मराठ्यांनी केला.परंतु ते त्यात यशस्वी झाले नाहीत.पहिला प्रयत्न जोत्याजी केसरकर यांनी केला. यानंतर अप्पा शास्त्री यांनी देखील केला. परंतु दोन्ही प्रयत्न अयशस्वी ठरले व संभाजीं महाराज औरंगजेबाच्या तावडीत सापडले.औरंगजेबाच्या तावडीत सापडल्या नंतर औरंगजेबाने महाराजांना इस्लाम धर्म स्वीकारण्याची जबरदस्ती केली.परंतु त्यांनी आपल्या धर्माचे पालन करत इस्लाम धर्म स्वीकारण्यास नकार दिला. त्याचप्रमाणे राज्याचा संपूर्ण खजाना आमच्या स्वाधीन करावा अशी अट घातली तेही संभाजीं महाराजांनी मान्य केली नाही.संभाजी राजांचा धीटपणा आणि स्वराज्याच्या प्रती प्रेम पाहून औरंगजेब तिलमिला झाला आणि तेव्हा पासून संभाजीं महाराजांना यातना देण्यास सुरुवात केली.तरीही औरंगजेबाची कोणतीही अट माणन्यास व त्यांच्या सामोरं यत्किंचितही झुकण्यास महाराज तयार नव्हते. संभाजी महाराजांनी औरंगजेबाला खडसावून सांगितले की स्वराज्याच्या रक्षणासाठी व प्रजेच्या हितासाठी कोणतीही तडजोड करणार नाही. यासाठी माझे प्राण गेले तरी चालेल. अशी सिंह गर्जना ऐकताच औरंगजेबाने संभाजीं महाराजांना कठोर यातना देण्यास सुरुवात केली.औरंगजेबाने महाराजांचे डोळे काढले, महाराजांची जीभ कापली, महाराजांवर अतोनात वार करण्यात आले.हे सगळं संभाजीं महाराज ४० दिवस सहन करीत होते. तरीही मराठा साम्राज्यासाठी लढत रहाले. एवढ्या छळाने सुध्दा औरंगजेबाचा आत्मा शांत झाला नाही. शेवटी औरंगजेबाने आपली संपूर्ण क्रूरतेची हद पार केली व ११ मार्च १६८९ रोजी महाराजांचे हात-पाय, आणि त्यांचे सर्व देह शरीरापासून वेगळे करून त्यांची क्रूरतेने हत्या करण्यात आली.शेवटी औरंगजेब हताश होऊन म्हणतो की 'माझ्या पोटी असा शूरवीर, धाडसी पुत्र जन्माला का आला नाही?"याची खंत त्याला मरेपर्यंत सतावत होती.शत्रूला हेवा वाटेल असे महान कार्य संभाजीं महाराजांनी केले व जगाच्या इतिहासात कमी वयात म्हणजे ३२ व्या वर्षी स्वराज्याच्या व प्रजेच्या रक्षणासाठी बलिदान देणारा राजा म्हणून संभाजीं महाराजांसमोर आज सर्वच नतमस्तक होतात. संभाजी महाराजांना बलिदान दिनानिमित्त निमित्त कोटी कोटी प्रणाम. महाराष्ट्र हा शूर वीरांचा व धर्मवीरांचा आहे.याची जान आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे.त्यामुळे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदान दिनाचे औचित्य साधून राज्यातील भ्रष्टाचार, महागाई, शेतकऱ्यांच्या समस्या, बेरोजगारी, आरोग्य , शिक्षण इत्यादी समस्याकडे जातीने लक्ष देण्याची गरज आहे.यामुळे जनतेला (प्रजेला) सुख-समाधान प्राप्त होईल. कारण आज आपण जो मोकळा श्वास घेतो व हसतो-बागडतो आहोत तो छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुंण्यायीमुळेच. हीबाब आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे. महाराष्ट्र ही संतांची, शुर वीरांची, थोर महात्म्यांची व क्रांतीकारकांची पावणभुमि आहे.याची जोपासना आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी करने अत्यंत गरजेचे आहे.धर्मवीरांनी महाराष्ट्र घडवीण्यासाठी बलीदान दिले.परंतु आजचा राजकीय पुढारी गरीब, सर्वसामान्य, शेतकरी यांचे रक्त भ्रष्टाचाराच्या माध्यमातून पीत आहे.याची खंत धर्मवीर संभाजी महाराज, साधुसंत, थोर पुरुष, क्रांतीकारक व आपले पुर्वज यांना अवश्य होत असेल.त्यामुळे कोणत्याही महापुरुषांचे बलीदान व्यर्थ जाणार नाही याची काळजी आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी घेतली पाहिजे व संभाजीं महाराजांचे आदर्श सामोरं ठेऊन पुढील वाटचाल व्हायला हवी.यातच आपल्याला धर्मवीर संभाजी महाराज दिसून येईल.आज बदलत्या हवामानामुळे प्रदूषणाच्या विळख्यात संपूर्ण पृथ्वी आहे.तीला वाचविण्यासाठी धर्मवीर संभाजी महाराज यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून युध्दपातळीवर मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण व्हायला हवे.कारण आज लावलेले वृक्ष शेकडो काळ टिकेल. याच वृक्षांच्या पाणात, फुलात, फळात व जळामुळात संपूर्ण थोर महात्म्याचे व शुरविरांचे दर्शन अवश्य होईल.त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील संपूर्ण गडकिल्ले सुसज्जित करून पर्यटनासाठी मोकळी करावीत. कारण गडकिल्ले महाराष्ट्राची आण-बाण -शान आहे. त्यामुळे त्यांची जपणूक केलीच पाहिजे. यामुळे नवीन पिढीला संपूर्ण गडकिल्ल्यांचा इतिहास समजण्यास सुलभ जाईल आणि शिवाजी महाराज व संभाजी महाराज यांचा इतिहास सहज समजूत येईल.कारण याच गडकिल्ल्यात महाराष्ट्राची संपूर्ण खरी संस्कृती दडलेली आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त कोटी कोटी प्रणाम व मानाचा मुजरा. हर हर महादेव!

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार.**
**(माजी विद्यापीठ प्रतिनिधी,नागपूर)**

# नैना प्रकल्पासंदर्भात ग्रामस्थांच्या मनातील शंका, संभ्रम दूर करा

## तोपर्यंत कोणत्याही पद्धतीची कारवाई सिडकोने करू नये अथवा तसा प्रयत्नही करू नये - आमदार प्रशांत ठाकूर




**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** सिडकोमार्फत पनवेल परिसरातील विमानतळासाठी नियोजित करण्यात आलेल्या नैना प्रकल्पासंदर्भात शासनाने प्रकल्पग्रस्तांसोबत तातडीने बैठकीचे आयोजन करून ग्रामस्थांच्या मनातील शंका, संभ्रम दूर करावेत. त्याशिवाय कोणत्याही पद्धतीची कारवाई सिडकोने करू नये अथवा तसा प्रयत्नही करू नये, अशी ठाम मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी राज्य विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात करत लक्षवेधी सूचना उपस्थित केली.दरम्यान, या संदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांनी सभागृहात बोलताना नैना प्रकल्पातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे निराकरण करूनच हा प्रकल्प मार्गी लावणे उचित ठरेल याकडे लक्ष वेधले. जोपर्यंत शेतकऱ्याचे समाधान होत नाही तो पर्यंत पुढील टाकू नये, अशी मागणी अधोरेखित केली. त्यावर मंत्री उदय सामंत यांनी ग्रामपंचायत, लोकप्रतिनिधी आणि तिथल्या नैना क्षेत्रातील प्रकल्पबाधितांना विश्वासात घेतल्याशिवाय सिडको पुढे जाणार नाही, असे आश्वासन आमदार प्रशांत ठाकूर यांना दिले. लक्षवेधी सूचनेवर उत्तर देताना उपमुख्यमंत्री तथा नगरविकासमंत्री एकनाथ शिंदे यांचे लेखी निवेदन सादर करण्यात आले. यामध्ये म्हटले आहे की, नैनामधील 46 गावांमध्ये नगर रचना परियोजना 1 ते 12 राबविण्यात येत आहेत. नगर रचना परियोजना तयार करताना गावठाण क्षेत्राबाहेरील सर्व सर्व्हे क्र./गट नंबरमधील क्षेत्राचा समावेश नगर रचना परियोजनांमध्ये करण्यात आला आहे. सिडको महामंडळाने नगर रचना परियोजना या 40:60च्या प्रमाणावर निश्चित केल्या आहेत. यानुसार जमिनधारकांच्या मूळ घरांचे संरक्षण व्हावे म्हणून त्यांचे मूळ घरावर 40% क्षेत्राचा भूखंड आरेखित करण्यात आला आहे. अशा प्रकारे अंतिम भूखंडामधील तसेच अंतर्गत रस्त्याखाली येणारी 5038 घरे तोडण्यात येणार असल्याची अफवा प्रसारमाध्यमांच्या द्वारे नैनामधील जमिनधारकांमध्ये पसरवण्यात आली होती ती चुकीची असून याबाबत सिडकोमार्फत 1 जानेवारी रोजी न्यूज बँड या वर्तमान पत्रात

## अधिवेशनंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत बैठक होणार - नामदार उदय सामंत


खुलासा देण्यात आलेला आहे. अद्यापपर्यंत नगर रचना परियोजनेमधील कोणत्याही बांधकामावर सिडकोमार्फत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, परंतु नगर रचना परियोजना-02 या योजनेतील प्रस्तावित रस्त्यामध्ये असलेल्या केवळ 16 बांधकामधारकांना सद्यस्थितीत त्यांना सक्षम प्राधिकरणाकडून प्राप्त केलेली बांधकाम परवानगीबाबतची कागदपत्रे सादर करण्यासाठी चौकशी पत्र देण्यात आलेली आहेत. या अनुषंगाने सिडकोमार्फत नैना क्षेत्रातील लोकप्रतिनिधीसोबत 6 जानेवारी 2025 रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीमध्ये व त्या बैठकीच्या निर्गमित केलेल्या इतिवृत्ताद्वारे याबाबतची वस्तुस्थिती सिडकोकडून स्पष्ट करण्यात आलेली आहे. याशिवाय रस्त्याने बाधित होणारी घरे तसेच गावठाण हद्दीलगत नगर रचना परियोजनेमधील अंतिम भूखंडामुळे बाधित होणाऱ्या घरांबाबत सविस्तर जागेवरील सर्व्हेक्षण तसेच ग्रामपंचायत सदस्यांना सुनावणीची संधी देऊन वस्तुस्थिती तपासून पुढील निर्णय सिडकोकडून घेण्यात येणार आहे.या अनुषंगाने सभागृहात बोलताना आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पनवेल येथे होत असलेले नवी मुंबई विमानतळ व्हावे यासाठी प्रचंड प्रयत्न केले आणि या प्रयत्नातून येत्या दोन महिन्यात हे विमानतळ सुरू होत आहे. या विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव देण्याचा प्रयत्नही राज्य शासनाने केला. या विमानतळाचे पुनर्वसन आदर्शवत झाले आहे. अशा वेळी विमानतळामुळे प्रभावित होणाऱ्या नैना क्षेत्रात मात्र ज्या टीपीएस स्कीम बनविल्या जातात त्याबाबत तेथील शेतकऱ्यांमध्ये प्रचंड अस्वस्थता आहे. वेळोवेळी वेगवेगळ्या आंदोलनांच्या माध्यमातून ते शेतकरी आपली अस्वस्थता व्यक्त करतात. वारंवार सिडकोकडून हुकूमशाही पद्धतीने निर्णय जाहीर केले जातात आणि ग्रामस्थ, लोकप्रतिनिधींनी त्यांच्यामागे फरफटत जावे अशी सिडकोची वागणूक आहे. या ठिकाणी सिडकोने मूळात जाहीर केले की, 60 टक्के जमीन सिडको घेणार आणि 40 टक्के जमीन शेतकऱ्याला देणार. याला पहिल्यांदा शेतकऱ्यांचा विरोध आहे तसेच जी उर्वरित जागा आहे त्यामध्ये अडीच एफएसआय दिला जाणार आहे. तो अडीच एफएसआय कन्झ्युम तर करता आला पाहिजे. अनेक छोटी जमीन असलेल्या शेतकऱ्यांची तक्रार आहे की अडीच एफएसआय कन्झ्युम होत नाही. म्हणजे 60 टक्के जमीन तुम्ही घेणार आणि 40 टक्के जमीन शेतकऱ्याला देणार मग त्यात जर अडीच एफएसआय कन्झ्युम होणार नसेल, तर या स्कीमचा या शेतकऱ्याला उपयोग काय? आणि या समस्येचे निवारण शासन कसे काय करणार, असा सवाल आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित केला. दुसरे असे की, या संदर्भात उत्तर देताना शासनाने म्हटले आहे की जमीनधारकांच्या मूळ घरांचे संरक्षण व्हावे म्हणून त्यांच्या मूळ घरावर 40 टक्के भूखंड आम्ही आरक्षित केलेला आहे. त्या ठिकाणी टीपीएस स्कीम म्हणजे लँड पुलिंग स्कीम आहे. तुम्ही 40 टक्केच भूखंड देणार, तोसुद्धा त्याच्या घरावर टाकणार, ही सिडको प्रशासनाची हुकूमशाही आहे. शेतकऱ्यांनी स्वतःच्या जागेवर बांधलेले घर, कदाचित यातील काही घरे विनापरवानगी असतील. तरीसुद्धा तुम्ही ही घरे टीपीएस स्कीममध्ये घेण्याचा अट्टाहास का? दुसरा प्रश्न असा की, जी घरे तुम्ही टीपीएस स्कीममध्ये घेताय त्याला ग्रामस्थांचा प्रचंड विरोध आहे. याबाबत शेतकऱ्यांच्या भावना तीव्र पराकोटीच्या आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना डावलून सिडको प्रशासन हा प्रकल्प आणू शकत नाही. तुम्ही टेंडर काढा, काहीही करा तिथे ग्रामस्थ सिडकोला इंचभर जमीन देण्यास तयार नाहीत. ग्रामस्थांचा विरोध आहे, मग टीपीएस स्कीममध्ये घरे घेण्याचा अट्टाहास का? त्याचप्रमाणे ही घरे टीपीएस स्कीममधून वगळण्याचा निर्णय शासन घेणार का, असाही सवाल आमदार प्रशांत ठाकूर यांनी सभागृहात उपस्थित केला. यावर उपमुख्यमंत्री तथा नगरविकासमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वतीने उत्तर देताना मंत्री उदय सामंत यांनी सांगितले की, शेतकऱ्यांच्या विरोधात जाऊन किंवा त्यांना विश्वासात न घेता जबरदस्तीने काम करण्याची सिडकोचीही इच्छा नाही. 60:40 रेशोची ही योजना आहे. मला असं वाटतंय की 3155 लाभधारकांना 40 टक्केमध्ये त्यांची घरे तशीच ठेवण्याचा निर्णय अगोदरच सिडकोने घेतलेला आहे. उर्वरित जी घरे रस्त्यामध्ये येताहेत त्यांचे ॲक्वीझिशन करणे गरजेचे आहे. तरीसुद्धा त्यांना नुसती चौकशीसाठी नोटीस दिली आहे. कुठेही ही घरे पाडण्याचा निर्णय सिडकोने घेतलेला नाही. ग्रामपंचायत, लोकप्रतिनिधी आणि तिथल्या प्रकल्पबाधितांना विश्वासात घेतल्याशिवाय सिडको तिथे पुढे जाणार नाही, असे आश्वासन मंत्री सामंत यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांना दिले.यावर आमदार प्रशांत ठाकूर यांनी म्हटले की, मंत्रीमहोदयांनी जे उत्तर दिले ते टीपीएस स्कीममधील घरे, रस्ते याचे प्रश्न आहेतच, पण मूळ प्रश्न जो विचारलाय आणि ग्रामस्थांची सगळ्यात मोठी तक्रार आहे की, गावठाणाच्या बाहेर तुमची टीपीएस स्कीम असल्यास हरकत नाही, पण गावठाणालगतची घर आहेत, गावठणातील घरे आहेत त्यावर तुम्ही प्लॉट टाकले आहेत. म्हणून शेतकऱ्यांच्या भावना संतप्त आहेत. 2013सालचा हा प्रकल्प आहे. या प्रकल्पाला आज शेतकऱ्यांचा विरोध एवढा वाढला, कारण त्यांची संमती नसताना त्यांच्या घरांवर प्लॉट टाकले. याला लँड पुलिंग स्कीम कसे म्हणायचे? गावठाणालगतची जी घरे आहेत ती पहिल्यांदा टीपीएस स्कीममधून वगळली पाहिजेत आणि फार छोटा म्हणजे दोन-पाच टक्क्यांच्या वर या घरांची जागा असणार नाही. त्यामुळे हा प्रश्न उगीच गुंतागुंतीचा करून यामध्ये जर वेळ घालवला तर प्रचंड वेळ जाईल. ते लक्षात घेता ही घरे वगळणे गरजेचे आहे. तो निणर्य शासन घेणार का? आणि हे सर्व विषय आहेत यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जर याची बैठक घेतली, तर शेतकऱ्यांचे समाधान होऊन हा प्रकल्प मार्गी लागू शकतो. त्यामुळे तशी बैठक शासन घेणार का, अशीही विचारणा आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली. यावर उत्तर देताना मंत्री उदय सामंत यांनी, गावठाणामध्ये कारवाईची भूमिका सिडकोने जर का घेतली असेल तर ती तपासून पाहिली जाईल तसेच शेतकऱ्यांच्या संपूर्ण प्रश्नांसंदर्भात अधिवेशनानंतर बैठक घेण्यासाठी उपमुख्यमंत्री तथा नगरविकासमंत्री एकनाथ शिंदे यांना विनंती केली जाईल, असे आश्वासन आमदार प्रशांत ठाकूर यांना दिले.

**5038 घरे तोडण्याची फक्त अफवा असल्याची उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची लेखी निवेदनात माहिती**

# आष्टी तालुक्यातील वाहिरा येथे संत शिरोमणी शेख महंमद महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त यात्रोत्सवाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**अंभोरा (प्रतिनिधी ) :** ११ मार्च ला वाहिरा येथे संत शिरोमणी शेख महंमद महाराज यांचा यात्रा उत्सव फाल्गुन शुध्द नवमीच्या रात्री हिंदु मुस्लिम धर्मातील भाविक शेख महंमद महाराजांच्या समाधीवर चंदनलेप, फुलांचा हार व चादर अर्पण करुन यात्रा उत्सवाला प्रारंभ होतो तर दशमीच्या दिवशी ग्रामस्थांच्यावतीने नैवद्य मलियाचा प्रसाद अर्पण केला जातो. यादिवशी शेख महंमद महाराजांची पालखी मिरवणूक टाळ, मृदंगाच्या गजरात, आनंदी वातावरणात बंगल्यापासून समाधीपर्यंत येते. सर्व धर्मियांच्या सहकार्याने यात्रोत्सवात आजही राज्यातील व राज्याबाहेरील सर्व धर्मिय भक्त सहभागी होतात. यात्रेच्या दिवशी सकाळीच पुजा विधी करुन दर्शन रांग सुरु होते. यावेळी ग्रामस्थांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते.अनेक वर्षांपासून पुणेकरांचे विविध विषयांवरील नाटके तसेच संत जीवनावरील चित्रपट सादर झाली. या वर्षी आत्रे निमित्ताने समाज प्रभोधन करा ह. भ. प. इंदोरीकर महाराज यांचे ९ ते ११ या वेळेत जी. प. प्रा. शाळेच्या प्रागणात कीर्तन होणार आहे.



या कीर्तनाचा पंच कृषितील भाविकांनी लाभ घ्यावा असे आव्हान वाहिरा ग्रामस्तानी केले आहे.हा यात्रा उत्सव शाकाहारी आणि सद्विचारांचा असल्यामुळे यात्रेमध्ये भक्तगण हा स्वतःहून स्वयंशिस्त पाळतात. त्यामुळे समाजाचा समाजाला कोणत्याही प्रकारचा त्रास होत नाही.संत शिरोमणी शेख महंमद महाराज हे एक प्रसिद्ध संत होते, जे सोळाव्या शतकात होऊन गेले. ते संत तुकारामांचे समकालीन होते आणि त्यांना कबिराचे अवतार मानले जाते, तसेच ते हिंदू-मुस्लीम ऐक्याचे प्रतीक होते.शेख महंमद महाराजांचा कार्यकाळ म्हणजे सोळाव्या शतकात होऊन गेले. त्यांनी मराठी, हिंदी, उर्दू आणि फारसी भाषेत काव्यरचना केली. त्यांनी 'योगसंग्राम', 'पवन विजय', 'निष्कलंक प्रबोध' आणि 'ज्ञानसागर' यांसारखे ग्रंथ लिहिले तसेच अनेक अभंग लिहिली. त्यांचे गुरू चांद बोधले होते, ज्यांनी त्यांना ज्ञानेश्वरीची प्रत भेट दिली होती. संत तुकाराम आणि संत शेख महंमद यांच्या मैत्रीच्या अनेक कथा प्रसिद्ध आहेत. त्यांची कबर अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा येथे आहे, जिथे दरवर्षी त्यांची स्मृती साजरी केली जाते. त्यांच्या साहित्यात हिंदू-मुस्लीम ऐक्याचे आणि मानवी मूल्यांचे महत्त्व सांगितले आहे.

**अद्वैत वेदांताचे अनुयायी:**

ते हिंदू तत्त्वज्ञानाच्या अद्वैत वेदांत शाळेचे अनुयायी होते. ते राज महंमद आणि फुलाई मातेच्या पोटी अवतारी संत म्हणून जन्माला आले असे म्हटले जाते. त्यांच्यावर वारकरी संप्रदायाचा प्रचार करत असले तरी त्यांचा सुफी संप्रदायाशी संबंध होता असे इतिहासकारांनी नोंदवले आहे. ते प्रबोधनकार आणि विज्ञानवादी संत म्हणून ओळखले जातात

# मिरजमध्ये भारताच्या विजय जल्लोषात विघ्न

## पाकिस्तान धार्जिण्या टोळक्यांचा गोंधळ

**दैनिक युवक आधार**

**मिरज** : भारताच्या ऐतिहासिक विजयाचा जल्लोष साजरा करत असलेल्या तरुणांवर पाकिस्तानधार्जिण्या टोळक्यांनी हल्ला करत गोंधळ घातल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. भारताच्या विजयाचा आनंदोत्सव साजरा करत असताना या तरुणांनी पाकिस्तानविरोधी घोषणा दिल्या. मात्र, त्यावर काही समाजकंटकांनी आक्षेप घेत गोंधळ घालण्याचा प्रयत्न केला.ही घटना भारताच्या सार्वभौमत्वास आणि राष्ट्रीय सुरक्षेस गंभीर धोका निर्माण करणारी आहे.

भारतात राहताना, येथील सुखसोयी उपभोगताना जर कोणी पाकिस्तानप्रेम दाखवत असेल आणि भारतविरोधी मानसिकता जपत असेल, तर तो अत्यंत गंभीर प्रश्न आहे. अशा समाजविघातक प्रवृत्ती वेळीच रोखल्या नाहीत, तर भविष्यात त्याचे गंभीर परिणाम भारताला भोगावे लागू शकतात.या घटनेनंतर स्थानिक नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली असून, दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली जात आहे.

पोलिसांनी तातडीने कारवाई करत समाजकंटकांना अटक करून त्यांच्या विरोधात कडक कायदेशीर कारवाई करावी, अशी नागरिकांची मागणी आहे.राष्ट्रीय एकात्मतेला आव्हान देणाऱ्या अशा घटना रोखण्यासाठी प्रशासनाने कठोर भूमिका घेतली पाहिजे. अन्यथा, देशाच्या सुरक्षेला धोका निर्माण करणाऱ्या अशा प्रवृत्ती भविष्यात आणखी बळावू शकतात.

==============================

# उरण मेडिकल वेल्फेअर असोसिएशन कडून उरणच्या महिलांना महिला दिनाची एक अनोखी भेट

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी :** "महिला सक्षमीकरण आणि मानवता सक्षमीकरण" हे ब्रीदवाक्य असलेली हि आरोग्य सेवा म्हणजेच आजारांचे निदान, उपचार आणि त्यावर प्रतिबंध करण्यासाठी देण्यात येणाऱ्या सेवेला वैद्यकीय सेवा म्हणतात आणि या अशा वैद्यकीय सेवेमुळे एखाद्या व्यक्तीचे आरोग्य तर उत्तम होतेच पण त्या व्यक्तीला जीवनदान मिळते. डॉक्टर रुग्ण यांच्यातील हे नाते विश्वास, आदर, संवाद यावर आधारलेले असते.अशा या वैद्यकीय सेवेचे इंडियन कॅन्सर ट्रीटमेंट सेंटर (आय.सी.टी.सी.) यांच्या संयुक्त विद्यमाने उरण मेडिकल वेल्फेअर असोसिएशन कडून ब्रेस्ट कॅन्सर विषयी जनजागृती आणि मोफत थर्मल मेमोग्राफी शिबिराचे आयोजन हॉटेल भोईर गार्डन कोट नाका उरण येथे जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून रविवार दिनांक ९ मार्च २०२५ रोजी आयोजित करण्यात आले होते.डॉ. घनश्याम पाटील (अध्यक्ष उरण मेडिकल वेल्फेअर असोसिएशन) डॉ. सलील पाटकर (आय.सी.टी.सी वाशी आणि पनवेल) डॉ. सत्या ठाकरे (सेक्रेटरी



उरण मेडिकल वेल्फेअर असोसिएशन) डॉ. सचिन गावंड (खजिनदार उरण मेडिकल वेल्फेअर असोसिएशन) यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर घेण्यात आले. त्याचप्रमाणे उरण मधील महिलांच्या विविध सामाजिक संस्था वुमेन ऑफ विस्डम सामाजिक व शैक्षणिक संस्था उरण, कुटुंबिनी महिला संघ उरण, कलश इंटरटेनमेंट, माई फाउंडेशन, पत्रकार उत्कर्ष समिती , स्वर्गीय तृप्ती सुधीर सुर्वे फाउंडेशन, महालन सामाजिक संस्था उरण, आधार फाउंडेशन या संस्थांचा यामध्ये सहभाग होता.डॉ. संगीता डाके (एमडी गायनोलॉजिस्ट) डॉ. मोना बोरकर (एमडी गायनोलॉजिस्ट) डॉ.कृष्णा बोरकर (गायनालॉजिस्ट )डॉ. रंजना म्हात्रे (सांस्कृतिक सेक्रेटरी) डॉ. शुभांगी मोकल (सांस्कृतिक सेक्रेटरी) डॉ. सुलोचना पाटील, डॉ. राणू ठाकरे, डॉ.प्राजक्ता कोळी, डॉ. दया परदेशी डॉ. सविता डेरे, डॉ.वनिता पाटील या महिला डॉक्टरांनी या शिबिरासाठी महत्वाचे योगदान दिले आहे.स्तनाचा कर्करोग हा भारतासह जगभरातील महिलांना प्रभावित करणारा एक महत्त्वाचा आरोग्यविषयक चिंतेचा विषय आहे. याविषयी उपचारांचे निकाल सुधारण्यासाठी आणि जीव वाचवण्यासाठी लवकर निदान आणि वेळेवर हस्तक्षेप करणे अत्यंत महत्त्वाचे आहे या विषयावर जागरूकता वाढवणे स्तनाच्या कर्करोगाचे निदान झालेल्यांना मदत करणे, या रोगाविषयीचे सखोल मार्गदर्शन करणे गरजेचे आहे, महिलांच्या मनातील या आजाराविषयीची भीती घालवण्यासाठी आजचे उरण डॉक्टर वेल्फेअर असोसिएशनने घेतलेले शिबिर हे अत्यंत महत्त्वपूर्ण आणि जागृती निर्माण करणारे होते.या शिबिराची सुरुवात मंगलमय वातावरणात झाली. सदर कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी उरण मेडिकल वेलफेअर असोशिएशन चे पेट्रन डॉ.सुरेश पाटील,आणि डॉ. मंगेश डाके हे उपस्थित होते. मांगल्याचे प्रतीक असलेले दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली येणाऱ्या प्रत्येक महिलेला बसण्यासाठी उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. त्याचप्रमाणे वेळोवेळी तज्ञ डॉक्टरांच्या व्याख्यानातून त्यांच्या मनातील भीती घालवण्यात आली. दिवसभरात ८५ महिलांची थर्मल मेमोग्राफी करण्यात आली. उर्वरित महिलांची दिनांक १०/३/ २९२५ रोजी भोईर गार्डन या नियोजित ठिकाणीच ५५ महिलांची थर्मल मेमोग्राफी करण्यात आली. आजार आणि भीती हे समीकरण असले तरी आजचे शिबिर मात्र महिलांनी मनातील भीती घालवून मोकळ्या मनाने या शिबिरास उत्तम प्रतिसाद दिला या शिबिरा करता फक्त उरण मधूनच नाही तर उरणच्या आजूबाजूच्या गावातूनही महिला सहभागी झाल्या होत्या. सकाळी १० वाजल्यापासून ते संध्याकाळी ७ वाजेपर्यंत या शिबिरात महिलांच्या थर्मल मेमोग्राफीची चाचणी घेण्यात आली. मेडिकल वेल्फेअर असोसिएशनची संपूर्ण टीम त्याचप्रमाणे सीमा घरत महालण सामाजिक संस्था, श्लोक पाटील कलश इंटरटेनमेंट आणि कुटुंबिनी महिला संघ, कल्पना सुर्वे स्वर्गीय तृप्ती सुधीर सुर्वे फाउंडेशन, सारिका पाटील वुमन ऑफ विस्डम सामाजिक आणि शैक्षणिक संस्था ,रंजना म्हात्रे पत्रकार उत्कर्ष समिती ,अश्विनी धोत्रे आधार फाउंडेशन ,निलिमा थळी वुई क्लब उरण,सुरेखा भोईर वुई क्लब द्रोणागिरी भावना भोईर ,रंजना म्हात्रे, तृप्ती भोईर आदी सामाजिक संस्थांच्या महिला हे शिबिर यशस्वी करण्यासाठी सहभागी झाल्या होत्या.उरणच्या महिलांना उरण डॉक्टर वेल्फेअर असोसिएशन कडून हि दिलेली आरोग्य सेवा एक अनमोल अशी भेट होती.त्यामुळे आलेल्या प्रत्येक महिलेने या आरोग्य सेवे विषयी कृतज्ञता व्यक्त केली.

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) **हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.**

**daily YUVAK ADHAR (RNI NO :- MAHMAR/2023/89514) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle**

# माझा जीवन प्रवास

दैनिक युवक आधार

मी, श्री विक्रम व्ही वसावे आदिवासी विभागातील एक होतकरू तरुण मुलगा असून मनात कांहीतरी यशस्वी प्रयोग करून जीवनाचे श्रम साफल्य सिद्ध करणारा युवक आहे! समोर येणाऱ्या परिस्थितीला सामोरे जाऊन स्वतःची सिद्धता सिद्ध करणारे पॉझिटीव्ही विचार जगणार मी आदिवासी खानदेशी युवक म्हणून मागदर्शन करतो आहे! आपल्या सानिध्यात येणाऱ्या युवकाला बांधनमुक्त जीवन जगण्याची कलागुण देण्याचे अनमोल कार्य मी करतो आहे !

मी आज दिनांक 09 मार्च 2025 रोजी बी एम बिर्ला सॅनिटोरिम,हैद्राबाद येथे "भारत समाज भूषण पुरस्कार सन 2025 " CSM 9 चॅनलचे सर्वश्री श्री सत्यनारायणजी जाधव सरांच्या मार्गदर्शनाखाली मान्यवरांच्या देण्यात आला असून आणखी पंख मजबूत झाले आहे असं खरचं वाटते आहे,तसेच स्वतंत्ररित्या कास्टिंग डारेक्टर म्हणून चांगली ओळख निर्माण केली असून मला अभिमान आहे की मी खान्देशचा अदिवासी पुत्र असल्याचा सार्थ अभिमान आहे याशिवाय माझे स्वप्न हे माझे पंख असून त्या पंखाना बळ देण्याचे काम माझे ईष्टमित्र प्रख्यात शिवशाहीर श्री रामेशजी खाडे सर सोलापूरकर तसेच कविवर्य , सैनिक,लेखक मित्र श्री अशोक मोहिते सर बार्शीकर सातत्याने करत असतात!

**जिंकले मी कार्यात मन वारंवार**
**म्हणूनच जीवनाचा केला उद्धार**
**नाही मानली मी कधीच हार**
**घडविले विश्व पहा स्वबळावर!!**



**श्री विक्रम व्ही वसावे**
**कास्टिंग डारेक्टर**
**नंदुरबार(खानदेश)**

# भारज बुद्रुक ते शेगाव पायी दिंडी सोहळा दहा तारखेपासून सुरुवात

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी । ज्ञानेश्वर कुं निकाळजे**
**वरूड / जाफ्राबाद** : जाफराबाद तालुक्यातील मौजे भारज बुद्रुक येथील भव्य दिव्य दिंडी सोहळा दिनांक 10 पासून सुरुवात झाली असून भारज बुद्रुक येथील श्री संत गजानन महाराज पायी दिंडी सोहळा गेल्या सात वर्षापासून चालू आहे दिंडीचे हे सातवे वर्ष असल्याने पायी दिंडी सोहळ्याची जय्यत तयारी दिंडी सोहळा कमिटी व ग्रामस्थांच्या वतीने चालू करण्यात आलेली आहे या दिंडीचे नियोजन एक महिन्यापासून सुरुवात झालेली असते दिंडीमध्ये जवळपास आठशे महिला व सातशे पुरुष वारकरी भारज बुद्रुक ते शेगाव पायी दिंडीमध्ये सहभागी असतात महिला व पुरुष अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पायी चालतात त्यामुळेच या पायी दिंडीचे रस्त्यावर चालताना प्रत्येकाच्या तोंडून कौतुक निघते दिनांक 10/3/ 2025 रोज सोमवार ते दिनांक 14 /3 /2025 रोजी शुक्रवार पर्यंत पायी दिंडी बुलढाणा जिल्ह्यामध्ये राहणार आहे दिनांक दहा तीन 2025 रोजी मौजे भारज बुद्रुक येथून सकाळी ठीक 7 वाजता भारज बुद्रुक येथील दिंडी क्षेत्र शेगाव येथील प्रस्थान होईल बुलढाणा जिल्ह्यामध्ये भोकर तालुका चिखली येथे सकाळी ठीक 11वाजता आगमन



होईल भोकर तालुका चिखली येथून पळसखेड चांदे मार्गे चिखली शहरांमध्ये छत्रपती संभाजीनगर येथे आगमन होईल चिखली शहरामध्ये छत्रपती संभाजीनगर ते चिंच परिसर राजा टावर रोड डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बस स्थानक जिल्हा केंद्रीय बँक खामगाव रोड ते मुक्काम ठिकाणी शेलु देते प्रथम मुक्काम ठिकाण राहील दिनांक 11 तीन 2025 वार मंगळवार शेलुदेतून प्रस्थान पेट ते अमडापूर उदयनगर उंदरी येथे द्वितीय मुक्काम राहील दिनांक 11 तीन 2025 वार मंगळवार शेलुद येथुन प्रस्थान पेठ ते अमरापूर उदयनगर उंदरी येथे द्वितीय मुक्काम राहील दिनांक 12/ 3/ 2025 वार बुधवार उदयनगर येथून प्रस्थान ते खामगाव महामार्गाने ते गणेशपुर ते हिवरखेड ते आंतरज येथे तृतीय मुक्काम राहील दिनांक 13 /3/ 2025 वार गुरुवार अंतर्ज येथून प्रस्थान ते खामगाव महामार्ग ते खामगाव शहरात वाय पॉईंट सजनपुरी अमरापूर नाका निर्मल टर्निंग टिळक पुतळा चांद मारी शेगाव रोड ने प्रस्थान व संत गजानन महाराज यांच्या शेतात चतुर्थ मुक्काम राहील संत गजानन महाराज यांच्या शेतातून दर्शणार्थ दिनांक 14 /3/ 2025 वार शुक्रवार या रोजी शेगाव मार्गे इंजीनियरिंग कॉलेज बस स्थानक छत्रपती शिवाजी महाराज चौक ते संत गजानन महाराज मंदिर व समारोप सदर दिंडी सोहळा सोबत महिला व पुरुष पंधराशे संख्या असेल त्यात 800 महिला व 700 पुरुष राहतील सदर दिंडी सोबत लहान-मोठे 40 वाहन राहतील सदर दिंडी सोहळ्याचे चार ते पाच दिवसाचे नियोजन आहे यासंदर्भात भारज बुद्रुक दिंडी सोहळा कमिटीने पत्रकारांना माहिती दिली

## कुपोषणाविरुद्ध लढा देणाऱ्या सुपोषण संगिनींचा सन्मान

# आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने 'स्टोरीज ऑफ संगिनीःअ ट्रिब्युट टू देअर स्ट्रेंग्थ' मालिकेचे लोकार्पन

**दैनिक युवक आधार**
**मुबंई** : मुंबई, १० मार्च २०२५: अदानी विल्मार लिमिटेड (AWL), भारतातील आघाडीच्या अन्न आणि एफएमसीजी कंपन्यांपैकी एक, आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने 'स्टोरीज ऑफ संगिनीः अ ट्रिब्युट टू देअर स्ट्रेंग्थ' या चार-भागांच्या व्हिडिओ मालिकेचे लोकार्पन केले. ही मालिका फॉर्च्युन सुपोषण उपक्रमातील विविध संगिनींच्या योगदानावर प्रकाश टाकेल. या संगिनी म्हणजे गावस्तरीय स्वयंसेविका आहेत, ज्या भारतातील विविध भागांमध्ये आरोग्य आणि पोषणाबाबत जनजागृती करून स्थानिक समुदायावर सकारात्मक प्रभाव टाकत आहेत. २०१६ मध्ये सुरू झालेला फॉर्च्युन सुपोषण कार्यक्रम हा आदाणी विल्मारचा उपक्रम आहे, जो आदाणी फाउंडेशनद्वारे राबविला जातो. हा उपक्रम अदानी समूहाच्या CSR (कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी) उपक्रमाचा एक भाग आहे. या प्रकल्पाने ग्रामपंचायती, स्थानिक प्रशासन, आरोग्य सुविधा आणि आशा कार्यकर्त्यां यांसारख्या हितसंबंधींशी सक्रिय सहभाग घेत अनेक जीवनांवर सकारात्मक प्रभाव टाकला आहे.

'स्टोरीज ऑफ संगिनीः अ ट्रिब्युट टू देअर स्ट्रेंग्थ' या नव्याने सुरू झालेल्या व्हिडिओ मालिकेतील पहिला व्हिडिओ एका संगिनीच्या प्रवासाचा मागोवा घेतो. या व्हिडिओमध्ये ती आरोग्य तपासणी करते, पोषण जागरूकता सत्रांचे



नेतृत्व करते आणि महिलांना प्रशिक्षण देते. तसेच, या उपक्रमाचा भाग झाल्यानंतर तिच्या स्वतःच्या आयुष्यात झालेले बदल ती शेअर करते. यामध्ये प्रभावी निवेदनाच्या (voiceover) माध्यमातून तिची महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित केली जाते, ज्या मुळे ती तळागाळातील जीवनांमध्ये सकारात्मक परिवर्तन घडवत आहे.श्री.अंगशू मलिक, व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, अदानी विल्मार लिमिटेड म्हणाले,"सुपोषण संगिनी या खऱ्या अर्थाने परिवर्तनाच्या शिल्पकार आहेत, ज्या समुदाय स्तरावर सकारात्मक बदल घडवत आहेत. सर्वांसाठी आरोग्य आणि पोषण सुधारण्याच्या त्यांच्या अथक प्रयत्नांमध्ये सशक्तीकरणाचा खरा अर्थ दिसून येतो. फॉर्च्युन सुपोषण प्रकल्प आमच्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे, आणि कुपोषण व अशक्तपणाविरुद्धच्या लढ्यात या उपक्रमाने गाठलेल्या प्रगतीचा आम्हाला अभिमान आहे. या प्रेरणादायी व्हिडिओ मालिकेद्वारे आम्ही त्यांच्या अथक प्रयत्नांचे दर्शन घडवत आहोत आणि आशा करतो की त्यांच्या कथा आणखी अनेकांना स्वतःच्या आरोग्याची जबाबदारी घेण्यासाठी तसेच इतरांना उन्नतीच्या दिशेने प्रवृत्त करण्यासाठी प्रेरित करतील."

फॉर्च्युन सुपोषण उपक्रमाने आपल्या स्थापनेपासून आजपर्यंत भारतातील १४ राज्यांमध्ये विस्तार करून ३४ ठिकाणी आपले कार्यक्षेत्र वाढवले आहे. या उपक्रमाअंतर्गत १९४६ गावे आणि १९० झोपडपट्ट्यांचा समावेश करण्यात आला असून, सुमारे २.५ दशलक्ष लोकांच्या जीवनावर सकारात्मक प्रभाव टाकण्यात आला आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून ० ते ५ वयोगटातील १,७९,८७३ बालकांपर्यंत पोहोचता आले आहे, तर ३,२८,८५४ प्रजननक्षम महिलांचे आरोग्य सुधारण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. तसेच १,०८,६०६ किशोरवयीन मुलींना त्यांच्या गरजेनुसार विशेष हस्तक्षेपाच्या माध्यमातून मदत करण्यात आली आहे.

## खेड पंचायत समिती येथे जागतिक महिला दिनानिमित्त महिलांचे सायबर सुरक्षा प्रशिक्षण संपन्न



**दैनिक युवक आधार**
**डॉ. देवेंद्र ओहाळ । खेड पुणे** : दिनांक 8/3/2025 रोजी पंचायत समिती खेड येथे जागतिक महिला दिनानिमित्त महिलांना सायबर सुरक्षा जागरूकता प्रशिक्षण आयोजित करण्यात आले,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा.गजाननजी पाटील साहेब, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी मा. चंद्रकांत वाघमारे साहेब, प्रकल्प संचालक मा. शालिनी कडून मॅडम, यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील एक लाख महिलांना सायबर सुरक्षा प्रशिक्षण देण्यात येत आहे, मा.विशालजी शिंदे साहेब, गटविकास अधिकारी. यांच्या मार्गदर्शनानुसार खेड तालुक्यातील महिलांना सायबर सुरक्षा प्रशिक्षण देण्यात येत आहे. मा.विशालजी शिंदे साहेब, गटविकास अधिकारी यांनी महिलांना जागतिक महिला दिन व सायबर सुरक्षा जनजागृती अभियान याविषयी मार्गदर्शन केले,aim, व क्रिएटिव्ह कॉम्प्युटर इन्स्टिटयूट प्रतिनिधी मा. तापकीर सर व सीमा कातोरे मॅडम यांनी महिलांना सायबर सुरक्षा जागरूकता प्रशिक्षण दिले.उपस्थितः - तळपे मॅडम, कक्ष अधिकारी. श्री. भोकटे साहेब विस्तार अधिकारी, श्री खिलारे सर, तालुका व्यवस्थापक. श्री वाखरे अनिल, शिंदे मॅडम प्रभाग समन्वयक, प्रभागसंघ पदाधिकारी, ग्रामसंघ पदाधिकारी, गटातील महिला उपस्थित होत्या

# शिधापत्रिका धारकांच्या महत्वपूर्ण प्रश्नावर आ. प्रशांत ठाकूर यांनी अधिवेशनात शासनाचे लक्ष केले केंद्रित

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)** : राज्यातील शिधापत्रिका धारकांच्या अडचणींवर आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात शासनाचे लक्ष वेधले. राज्यात अनेक ठिकाणी रेशनकार्ड मॅनेजमेंट सिस्टीम आणि ई-पॉस मशीनमधील तांत्रिक अडचणींमुळे सुमारे २५ लाख शिधापत्रिका धारक प्रभावित झाले होते, त्या अनुषंगाने शिधापत्रिकाधारकांच्या या महत्वपूर्ण प्रश्नावर आमदार प्रशांत ठाकूर यांनी शासनाचे लक्ष केंद्रित केले.राज्यात अनेक ठिकाणी अन्न नागरी पुरवठा विभागामार्फत सुरु असलेली रेशनकार्ड मॅनेजमेंट सिस्टीम ही वेबसाईट गत दोन-तीन महिन्यांपासून बंद आहे, तसेच रेशन



दुकानात बसविण्यात आलेल्या ई-पॉज मशिन मधील तांत्रिक अडचणी, सर्व्हर समस्या तसेच थम्ब कन्हेक्टीव्हीच्या समस्येमुळे धान्य पुरवठा बंद झाला असून राज्यात जवळजवळ २५ लाख शिधापत्रिकाधारक यामुळे बाधित झाले आहेत. त्यामुळे पात्र शिधापत्रिकाधारक रेशन धान्यापासून वंचित राहत असून नवीन शिधापत्रिका काढणे, नाव कमी करणे किंवा वाढविणे, उत्पन्नाचे निकष, दुबार शिधापत्रिका काढणे, आधार संबंधित कामे, वैद्यकीय उपचारासाठी लागणारे दाखले इतर अनेक कामे प्रलंबित असल्यामुळे पात्र शिधापत्रिकाधारकांना शासनाच्या योजनांचा लाभ घेण्यात अनेक अडचणी येत आहेत. सदर वेबसाईट तात्काळ सुरु करणेबाबत अनेक नागरिकांनी व लोकप्रतिनिधींनी शासनास मागणी करुनही त्याची अंमलबजावणी झाली नाही, त्या अनुषंगाने या सर्व प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर वेबसाईट तात्काळ सुरु करणे, ई-पॉज मशिन, सर्व्हर, थम्ब कन्हेक्टीव्हीटीबाबत तांत्रिक अडचणी दूर करुन सुरळीत धान्य पुरवठा करणेबाबत तसेच यातील दोर्षीवर कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात दाखल केला होता.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या प्रश्नावर लेखी स्वरूपात दिलेल्या उत्तरातून सांगितले कि, अन्न नागरी पुरवठा विभागामार्फत सुरु असलेली रेशनकार्ड मॅनेजमेंट सिस्टीम ही वेबसाईट दोन-तीन महिन्यांपासून बंद असल्याची तसेच रेशन दुकानात बसविण्यात आलेल्या ई-पॉज मशिन मधील तांत्रिक अडचणी, सर्व्हर समस्या, थम्ब कन्हेक्टीव्हीच्या समस्येमुळे धान्य पुरवठ्यात अडथळा येऊन जवळजवळ २५ लाख शिधापत्रिकाधारक यामुळे बाधित होण्याची आणि पात्र शिधापत्रिकाधारक रेशन धान्यापासून वंचित राहणे, नवीन शिधापत्रिका काढणे, नाव कमी करणे किंवा वाढविणे, उत्पन्नाचे निकष, दुबार शिधापत्रिका काढणे, आधार संबंधित कामे, वैद्यकीय उपचारासाठी लागणारे दाखले इतर अनेक कामे प्रलंबित असल्याची बाब अंशतः खरी आहे. रेशनकार्ड मॅनेजमेंट सिस्टीम व एईपीडीएस आणि इतर प्रणाली केंद्र शासनाच्या एनआयसी क्लाउडवर स्थलांतरीत करण्याची प्रक्रिया डिसेंबर २०२४ मध्ये सुरु असल्याने ई-पॉस मशिनद्वारे अन्नधान्य वितरणास व शिधापत्रिकासंबंधित ऑनलाईन कामकाज करताना तांत्रिक अडचणी



आल्या. तसेच केंद्र शासनाच्या आधार प्रणालीमध्ये देशपातळीवर तांत्रिक समस्या असल्याने लाभार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण करताना अडचणी आल्या होत्या. सद्यःस्थितीत विभागातील प्रणालींचे क्लाऊड मायग्रेशनची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून तांत्रिक अडचणी दूर करण्यात आल्या आहेत. डिसेंबर २०२४ व जानेवारी २०२५ मध्ये सरासरी ९२ टक्के अन्नधान्याचे वितरण लाभार्थ्यांना करण्यात आले आहे. विभागातील प्रणाली सुरळीत करण्याबाबत लोकप्रतिनिधी व नागरिकांकडून मागणी करण्यात आली. त्या अनुषंगाने केंद्र शासनाच्या राष्ट्रीय सूचना केंद्राला उचित सूचना देण्यात आल्या आहेत.

# शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा संकल्प पूर्ण होणार ,की पुन्हा घोषणेतच अडकणार ?

## उद्या सादर होणाऱ्या अर्थसंकल्पाकडे लागले शेतकऱ्यांचे लक्ष

**दैनिक युवक आधार**
**रिसोड वार्ताहर । रणजीत सिंह ठाकुर** : केंद्र सरकारचा अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर आता 3 मार्च पासून राज्य सरकारचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू झाले आहे.21 मार्च पर्यंत चालणाऱ्या या अधिवेशनात उद्या 10 मार्च रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार राज्याचा अर्थसंकल्प विधिमंडळात सादर करणार आहेत.

विधानसभा निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांची कर्जमाफी, नमो किसान सन्मान योजनेत तीन हजाराची वाढ तसेच लाडकी बहीण योजना 1500 रुपये ऐवजी 2100 रुपये देणार व ईतर अनेक आश्वासनांची घोषणा महायुतीने केली होती. मात्र सत्तेत येवून जवळपास अडीच, तीन महिन्यांचा कालावधी लोटला तरी या बाबत कुठलीच हालचाल झाली नाही. उद्या सादर होणाऱ्या अर्थसंकल्पात कर्जमाफीचा संकल्प पूर्ण होणार, की पुन्हा घोषणेतच अडकणार? या प्रश्नाचे उत्तर उद्याच स्पष्ट होणार असल्याचे बोलले जात आहे. परिणामी उद्याच्या अर्थसंकल्पाकडे शेतकऱ्यांसह, राज्यातील जनतेचे लक्ष लागले आहे.महायुती सरकारने त्यांच्या जाहीरनाम्यात शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचे ठोस आश्वासन दिलं होतं. विशेषतः निवडणूक प्रचारादरम्यान ग्रामीण भागात हा मुद्दा प्रामुख्याने उचलण्यात आला होता. लाडकी बहीण योजनेप्रमानेच शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा मुद्दाही महायुतीच्या विजयात परिणामकारक ठरला आहे. मात्र सरकार स्थापन होऊन जवळपास अडीच, तीन महिने उलटले तरीही या संदर्भात कोणताही ठोस निर्णय फडणवीस सरकार घेऊ शकले नाही. शिवाय नमो किसान आणि लाडकी बहीण



योजनेत वाढ केली असल्याची केवळ घोषणाच केली आहे. परंतु या घोषणेची प्रत्यक्ष अंमलबजावणी कोणत्या तिथीवर होणार हे अद्यापही गुलदस्त्यातच ठेवले आहे. तसेच सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी सुद्धा अलीकडेच एका जाहीर कार्यक्रमात कर्जमाफी देण्यासाठी सरकार बांधील असल्याचे स्पष्ट केले. मात्र त्या संदर्भात कोणतीही निश्चित कालमर्यादा सांगितली नाही. एव्हढेच नव्हे; तर " सरकार शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य देत असून, कर्जमाफी बाबत सकारात्मक निर्णय घेण्यात येईल " असं महायुतीतील सर्वच मंत्री,खासदार, आमदार बोलत आहेत.मात्र कधी ? असा प्रश्न उपस्थित केल्यास कोणीच उत्तर देत नाही. त्यामुळे उद्या सादर होणाऱ्या अर्थसंकल्पात तरी कर्जमाफीचा संकल्प पूर्ण होईल अशी अपेक्षा व्यक्त होत आहे

**महाविकास आघाडीने आक्रमक भूमिका घ्यावी अशी शेतकऱ्यांची अपेक्षा आहे**

महायुती सरकारचा 2025-26 चा पहिला अर्थसंकल्प मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार उद्या 10 मार्च रोजी सादर करणार आहेत.

राज्यात सद्या कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनला आहे. बदलापूर येथील अत्याचार प्रकरण, नुकतेच घडलेले स्वारगेट बसस्थानकातील बलात्कार प्रकरण, तसेच स्व. संतोष देशमुख हत्या प्रकरणातील सूत्रधार म्हणून वाल्मिक कराडच्या नावावर झालेले शिक्कामोर्तब त्या अनुषंगाने कराड व राष्ट्रवादीचे धनंजय मुंढे यांचे जवळचे संबंध आणि राष्ट्रवादीचेच मंत्री माणिकराव कोकाटे यांनी अल्प उत्पन्न दाखवून मिळवलेली सदनिका प्रकरण आदी अनेक मुद्दे सरकारला घेरण्यासाठी विरोधकांकडे आहेत. मात्र निवडणूक प्रचारादरम्यान सरकारने दिलेले शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचे आश्वासन सुद्धा तेव्हढेच गंभीर आहे. हे लक्षात घेऊन महाविकास आघाडीने आक्रमक भूमिका घ्यावी अशी शेतकऱ्यांची अपेक्षा आहे.

============

# राजर्षी शाहू महाराज सामाजिक पुरस्काराने मनोहर शहारे सन्मानित

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी - महेश पेंन्दोर**
**यवतमाळ : दी.10 मार्च** सामाजिक क्षेत्रात सातत्याने कार्यरत राहून समाज उन्नतीसाठी दिलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल निवृत्त सामाजिक अभियंता मनोहर शहारे यांना राजर्षी शाहू महाराज सामाजिक पुरस्कार-2025 प्रदान करण्यात आला. हा प्रतिष्ठित सोहळा सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समिती व मराठा सेवा संघ यवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमाने 19 फेब्रुवारी (बुधवार) रोजी छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसर,शिवतीर्थ,गार्डन रोड, यवतमाळ येथे संपन्न झाला.




**मनोहर शहारे : सामाजिक परिवर्तनाचे प्रतीक**

मनोहर शहारे यांनी आंबेडकरी चळवळीत सातत्याने सक्रिय राहून सामाजिक न्याय आणि समानतेसाठी उल्लेखनीय कार्य केले आहे.सामाजिक अभियंता म्हणून त्यांनी वंचित,मागासवर्गीय आणि उपेक्षित घटकांसाठी अनेक उपक्रम राबवले आहेत.त्यांचे कार्य केवळ विचारमंचावर मर्यादित न राहता,ते प्रत्यक्ष कृतीतून समाज बदलण्याचे कार्य करीत आले आहेत.त्यांची सामाजिक बांधिलकी आणि कार्यक्षम नेतृत्व राजर्षी शाहू महाराज सामाजिक पुरस्काराने गौरवले जाणे,ही समाजासाठी अभिमानाची बाब आहे.

या कार्यक्रमास मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर गायकवाड, तसेच सुनील कडू,मनीष पाटील, कृष्णा कडू,नानाभाऊ गाडबैले, अशोक घारपळकर,छाया महाले, आशा काळे,कॉम्रेड सचिन मनवर, शशिकांत खडसे,निशा बुटले आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिकेत आगलावे यांनी केले.पुरस्काराचे निवेदन प्रा. पंढरी पाठे,कार्यक्रमाचे प्रास्ताविक पुंडलिक बुटले,तर आभार प्रदर्शन विनोद डाखोरे यांनी मानले.या सन्मानाने सामाजिक परिवर्तनाच्या कार्याला प्रेरणा मिळेल,असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.मनोहर शहारे यांच्या कार्याची दखल घेतला गेलेला हा सन्मान संपूर्ण समाजासाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# सिल्लोड शिवसेना भवन येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतीदिनानिमित्त अभिवादन



**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी । योगेश पालोदकर**
**सिल्लोड** : आ.अब्दुल सत्तार यांचे जनसंपर्क कार्यालय सेना भवन येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतीदिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला.

याप्रसंगी युवानेते तथा माजी नगराध्यक्ष अब्दुल समीर अ. सत्तार यांच्याहस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यासोबतच तालुका शिवसेनेच्या वतीने शहरातील क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले चौकातील नामफलकास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी कृउबा समितीचे सभापती केशवराव पा. तायडे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख देविदास पा.लोखंडे, किशोर अग्रवाल, जिल्हा संघटक सुदर्शन अग्रवाल, तालुकाप्रमुख मारोती वराडे, कृउबा समितीचे संचालक सतीश ताठे, माजी नगराध्यक्ष श्रीमती राजश्री निकम, शिवसेना महिला आघाडीच्या उपजिल्हाप्रमुख दुर्गाबाई पवार, माजी उपनगराध्यक्ष शकुंतलाबाई बनसोड , अरुणा राजपूत , नॅशनल सहकारी सूतगिरणीचे संचालक विठ्ठल सपकाळ, शंकरराव खांडवे , राजेंद्र ठोंबरे , सिल्लोड शेतकरी सेवा सोसायटीचे चेअरमन राजेंद्र बन्सोड, किशोर अग्रवाल , जगदीश बेदवे, संतोष धाडगे, दत्ता शेजुळ, चांदापूर चे सरपंच रमेश ठाकूर ,फहिम पठाण, तोसिफ पठाण, उस्मान गणी, जगन्नाथ कुदळ ,साहेबराव बोराडे, बाबुराव मोठे आदींची उपस्थिती होती.